“आपले मंडळ ”

|| *Maharashtra Mandal of Detroit* ||

# स्नेहबंध

## गणपती विशेषांक



सप्टेंबर २०२३

॥ गणपती बाप्पा मोरया ॥

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ




Various Paint Technologies

- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Fin-ishes
- Much Much More...

## GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS



Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market

- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Cus-tom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements

Dhake
Industries

Please contact us for more information ▸▸▸

**Global Headquarters**
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

## अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | शीतल सोनार | ४ |
| २ | बहारों फूल बरसाओ | संजय मेहेंदळे | ९ |
| ३ | निळाई | डॉ. वीणा शहा | १६ |
| ४ | काटा रुते कुणाला | बाळकृष्ण पाडळकर | २१ |
| ५ | Thrill | तविशी दीक्षित | २५ |
| ६ | माझ्या नजरेतले (एम एम डी) | श्रीमती सी. एस. पाटील | ३१ |
| ७ | तुझ्या माझ्या गोष्टी | निरज आळतेकर | ३६ |
| ८ | "Yes Day" | शौनक विपट | ४२ |
| ९ | गेले पोहायचे राहुनी | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | ४६ |



**संपादक मंडळ:**
ज्योत्स्ना दिवाडकर,
अश्विनी राहुल पारठे
आशुतोष खुपेरकर

**मुखपृष्ठ:**
सोहम राहुल पारठे

**रचना व मांडणी :**
अश्विनी राहुल पारठे


---

लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

# अध्यक्षांचे मनोगत



## नमस्कार मंडळी,

गणराया येणार म्हटलं की मराठी मन हे हळवं होतंच!  “गणपती बाप्पा मोरया”, “मंगलमूर्ती मोरया” या घोषणांनी दुमदुमून जाणारे लहानपणीचे दिवस आठवले की भारावून जायला होतं. ज्या मोरया गोसावींचे नाव गणरायाशी कायमचे जोडले गेले आहे त्यांच्या चिंचवड गावात लहानपण गेल्याने मला तर बाप्पा माझ्या माहेरुनच आलेत असे वाटत आले आहे. नंतर गणपती बनवण्याचा व्यवसाय करणारे सासर मिळाले! मग काय, बाप्पा आपल्याबरोबर सगळीकडेच आहेत हीच कायमची समजून होऊन गेली.

आपल्यातील अनेकांचे बाप्पाशी असेच खूप जवळचे नाते असणार यात शंका नाही.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये सर्वसामान्य जनतेला एकत्रित आणण्यासाठी लोकमान्य टिळकांना “गणेश उत्सव” सगळ्यात रास्त वाटला असावा, तो प्रत्येकाच्या बाप्पाशी असलेल्या अश्या आगळ्यावेगळ्या जवळच्या नात्यामुळेच! गणेश चतुर्थीला आपण मातीपासून (इकडे self hardening clay) गणपतीची मूर्ती बनवतो. त्याची प्राणप्रतिष्ठा करून त्यात देवत्व आणतो. १० दिवस त्या देवाला आरत्या, मंत्रोच्चार आणि नैवेद्य दाखवत, पृथ्वीवरील चराचर सृष्टीचा आनंद देत संसारी बनवतो आणि अनंत चतुर्थीला वाजत गाजत, मिरवणूक काढून परमोच्च आनंदाच्या जाणिवेने, पुढच्या वर्षीच्या गणेश चतुर्थीच्या प्रतीक्षेत पाण्यात विसर्जन करून येतो! या निमित्ताने आपण जणू आपल्याच आयुष्याची आठवण स्वतःला करून देत असतो. मातीतून जन्माला आल्यापासून अनंताने निर्मिलेल्या सृष्टीचा पुरेपूर आनंद घेऊन पुन्हा समाधानाने मातीतच मिसळून जाण्यासाठी सज्ज व्हायचे आहे हेच स्वतःला ठासवत असतो. अश्या अनेक गहन अर्थाच्या सणांच्या देशाचा वारसा घेऊन आपण इथे आलोय याचा मला मनापासून अभिमान वाटतो.

महाराष्ट्रापासून सुमारे ८,००० मैल लांब मिशिगनला येऊन हे सगळे जपताना अनेकांच्या कलागुणांना वाव मिळाला आहे. खरंच ‘डेट्रॉईट महाराष्ट्र मंडळ’ म्हणजे एक जागृत कलाक्षेत्र म्हणता येईल! इथे नानाविध नाटकं, गाण्याचे, वादनाचे कार्यक्रम, डान्स बॅले, कथाकथन, ढोल ताशा अध्या अनेक कलाकृतींना वाव मिळत असतो.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीदेखील खास वेगवेगळया धर्तीचे कार्यक्रम आणताना आपण प्रत्येक वयोगटाच्या विचार केला आहे. २० ते ९० वयाच्या दर्दी लोकांनी भरलेलं आणि घडलेलं आपलं हे कुटुंब. एकच भाजी केली आणि ती सर्वांना आवडली असं कधी होतं का? तसंच इथेही - सर्वांना आवडेल असा एकच महा-कार्यक्रम करणं कधीच जमत नाही. तरीही कार्यक्रमाच्या निवडीतली विविधता सहजी जाणवते.  संक्रांतीला महाराष्ट्राची गरिमा दाखवण्याचा प्रयत्न झाल्यावर महेश काळेंच्या शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीताने पाडव्याची शान वाढवली. नंतर काहींना खूप आवडलेली पण काहींना अजिबात न रुचलेली नाटकं झाली.नाविन्यपूर्ण ‘रसिका तुझ्याचसाठी’ मधून “women entrepreneurs” चे हटके अनुभव, शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापनाची माहिती राहुल सोलापूरकरांच्या कथा सांगण्याच्या विशेष शैलीतून आपण ऐकली, ‘आरोग्यम् धनसंपदा’ या कार्यक्रमात योग आणि हायकिंगची अनुभूती,तसेच आपल्याच शेजारच्या ॲन आर्बर मराठी मंडळाबरोबर क्रीडांचे

कार्यक्रम, आगळी वेगळी पिकनिक, मुलांचे movie night हे सर्व आनंदाने करताना आपले मंडळ, इतर संस्थांच्या सामाजिक कार्यक्रमांना ही पुढे आणण्यासाठी सर्वतोपरी मदत करत आहे. philanthropic कार्ये करून समाजाचे ऋण फेडण्याचे सुद्धा काम मंडळाचे कार्यकर्ते करत असतात. पण मुळात आपल्याला आपले आपले विचार हे नाटके, नाट्कल्या, कविता, नाच, गाण्यांच्या माध्यमातून बघणे / दाखवणे जरा जास्तच जमते, नाही का?

या वर्षीच्या गणेश उत्सवाच्या निमित्ताने MMD च्या टॅलेंटेड मेंबर, देवेश, च्या ऍस्ट्रॉनॉमिकल फोटोंची आणि अवकाशातील ताऱ्यांवरील त्याने केलेल्या अभ्यासाची माहिती सगळ्यांपर्यंत पोहोचावी असे खूप मनात होते. ती आपल्या मंडळाच्या व्यासपीठावरून बघताना, आपल्या लहान मुलांच्या नाचण्यासाठी असलेल्या हक्काच्या प्लॅटफॉर्म वर "जमिनीवरच्या छोट्या ताऱ्यांनाही" तुम्ही बघणार आहात. तुम्हाला हा प्रयोग कसा वाटला ते आम्हाला नक्की कळवा. तुमचे अभिप्राय खूप महत्वाचे असतात. त्यातूनच नवनवीन गोष्टी अमलात आणण्यासाठी मंडळाच्या कार्यकारिणीला हुरूप मिळत असतो.

MMD चे "*शिलेदार*" ढोल-ताशा पथकाचे अफलातून तालावर थिरकवणे, लेझीम, लहानांच्या कलाकुसरीची प्रात्यक्षिके, मातीचे गणराया बनवण्याचे workshop, करमणुकीचे कार्यक्रम आणि फक्कड सुग्रास पुरणपोळीचे जेवण असे सगळे फक्त MMD- गणपती च्या कार्यक्रमामध्येच एकत्रित मिळू शकते.

मंडळाच्या सर्व समिती प्रमुख आणि स्वयंसेवकांच्या वतीने तुम्हा सर्वांचे २०२३ च्या MMD गणपणी - "*तारे जमीन पर*" या कार्यक्रमात खूप खूप स्वागत!

धन्यवाद !

**शीतल सोनार**
(MMD अध्यक्ष २०२३)
फोन – (248) 835 0952
ई-मेल – president@mmdet.org



# Sachin and Anuja Lawande Wish you all




# Happy Ganesh Chaturthi

State Farm

## TROY

2916 E LONG LAKE RD, TROY, MI 4808

**PH – 248-250-9708**

JAYMUNJ.COM

## ROCHESTER

1461 N ROCHESTER RD, ROCHESTER HILLS, MI 48307

**PH – 248-218-2526**

AGENTJAYMUNJ.COM



**JAY MUNJ STATE FARM.**

TECH 5
Technologies for Inclusion

& Rahul Parthe



Wishes you all A very
Happy Ganesh Chaturthi!

गणपती बाप्पा मोरया



# बहारों फूल बरसाओ

'बहारों फूल बरसाओ, मेरा मेहबूब आया है,  हवाओं रागिनी गाओ, मेरा मेहबूब आया है' (सूरज) पडद्यावर 'ज्युबिली'कुमार गळत होता.... काय थोर नशीब घेऊन येतात लोकं. ज्या दिवसांत 'सिल्व्हर ज्युबिली' हीच मोठी achievement होती, त्या काळात तब्बल पंचवीस सिनेमे, पंचवीस आठवडे चालले होते म्हणे या महाशयांचे..... असो!

पण माझ्या मनात मात्र 'टप टप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले; भिर भिर भिर त्या तालावर गाणे अमुचे जुळे' (कवी - मंगेश पाडगांवकर) गाण्याप्रमाणे 'फुलांच्या' गाण्याचा सडा पडत होता. सुदैवाने शालेय शिक्षण मराठी माध्यमातून झालेलं असल्याने या कवितेसारख्या, नादमाधुर्याने नटलेल्या अनेक कविता अभ्यासक्रमातच शिकायला, वाचायला मिळाल्या.

**'गोरी गोरी पान, फुलासारखी छान**

**दादा मला एक वहिनी आण'** ***(गीतकार: ग. दि. माडगूळकर)***



**'उघड उघड पाकळी, फुला रे उघड उघड पाकळी**

**आंतल्या आंत कोवळे मधुजीवन कां कोंडले?**

**बाहेर हवा मोकळी, फुला रे'** ***(कवी - ना. घ. देशपांडे)***

**'रंगरंगुल्या, सानसानुल्या, गवतफुला रे गवतफुला**

**असा कसा रे सांग लागला, सांग तुझा रे तुझा लळा'** ***(कवयित्री - इंदिरा संत)***

शाळेत कविता 'पाठांतर' हा एक वेगळाच त्रास होता. खाकी अर्धी चड्डी, त्यात पांढरा सदरा खोचलेला, हाताची घडी अशा अवतारात मास्तरांच्या टेबलाजवळ उभं राहून सगळी 'देवाघरची फुलं' (काही 'कळ्या'ही होत्या वर्गात- ते ही एक असो!!) पाठ केलेल्या कविता म्हणून दाखवताहेत. काही मुलं बऱ्यापैकी तालासुरात म्हणायची, पण माझ्या बाबतीत म्हणाल तर सुरांचा आणि माझा 'उभा दावा' असल्यामुळे प्रभू रामचंद्र जसे एकवचनी तसे अस्मादिक 'एकचाली'.

**'हिरवे हिरवे गार गालिचे....'** आणि **'खरबदार जर टाच मारुनी.....'**

सारं एकाच चालीत आणि तेसुद्धा चढ्या आवाजात..... पुन्हा असोच!!! 'फुला रे उघड उघड पाकळी' वरून आठवलं

**'अजुनी रुसूनी आहे, खुलता कळी खुले ना**

**मिटले तसेच ओठ कीं पाकळी हले ना'** ***(कवी अनिल, गायक - कुमार)***



हे गाणं जेंव्हा पहिल्यांदा  ,शाळेत असतांना, ऐकलं होतं तेंव्हा तेसुद्धा कळी-फुल यांचंच गाणं आहे असं वाटलं होतं; पण पुढे कॉलेजात गेल्यावर, हे वेगळ्याच 'कळी'ला उद्देशून असल्याचा साक्षात्कार झाला.

घरी आई मराठीची शिक्षिका, बाबांना नाट्य-संगीताची आवड, त्यामुळे वेगवेगळी गाणी ऐकायला मिळाली, काही मनाच्या पाटीवर कायमची कोरली गेली

**'काटा रुते कुणाला, आक्रंदतात कोणी**



**मज फूल ही रुतावे हा दैवयोग आहे'** ***(गीत - शांता शेळके)***

या गाण्याविषयी असं ऐकून आहे की, अभिषेकीबुवांना 'लोग काँटोंकी बात करते है; हमें तो फुलोंनेभी जख्म दिये है' अशा अर्थाचं गाणं हवं होतं आणि शांताबाईंनी "त्यात काय आहे" असं म्हणत क्षणार्धात 'काटा रुते कुणाला, मज फूलही रुतावे; हा दैवयोग आहे' हा मुखडा ऐकवला.

अशीच सहजगत्या आठवणारी आणखी गाणी म्हणजे

**'दिवस तुझे हे फुलायचे झोपाळ्यावाचून झुलायचे**

**फुलांनी जखमी करायचे'** ***(कवी - मंगेश पाडगांवकर)***

हे गाणं वीकेंडला 'बसणाऱ्या' लोकांची आजकाल tagline झालंय म्हणे. 'झोपाळ्यावाचून झुलायचे.....'

कोवळ्या सोनफुलांची सुंदर शब्दकळा असलेलं

**'फुलले रे क्षण माझे फुलले रे**

**मेंदीने, शकुनाच्या.. शकुनाच्या मेंदीने**

**सजले रे क्षण माझे सजले रे**

**झुळूक वाऱ्याची आली रे लेऊन कोवळी सोनफुले'** ***(कवी - नितीन आखवे)***

पुढे पुढे हिंदी सिनेगीतांनी गारुड सुरु केल्यावर तर काय विचारायलाच नको

कधी वैजयंतीमाला.... बरोबर ज्युबिलीकुमार.... शंभर टक्के सुख नाहीच येत का हो वाट्याला??

**'ऐ फूलों की रानी, बहारों की मलिका तेरा मुस्कुराना, गजब हो गया**

**ना दिल होश में है, ना हम होश में हैं नज़र का मिलाना, गजब हो गया'** ***(आरजू)***

तर कधी नूतन .... बरोबरच्या ठोकळ्याचं आता नावदेखील आठवत नाही.

**'फूल तुम्हें भेजा है ख़त में**

**फूल नहीं मेरा दिल है' (सरस्वतीचंद्र)**

**कधी सर्वकालीन प्रेमात आकंठ बुडालेला 'देव'**

**'फूलों के रंग से, दिल की कलम से,**

**तुझको लिखी रोज पाती'** ***(प्रेमपुजारी)***

माझ्यासारख्या आंधळ्या 'देव'भक्ताला हुबेहूब देव सारखा दिसणारा लहान मुलगा म्हणत असतो:

**'फूलों का तारों का, सबका कहना है**

**एक हज़ारों में मेरी बहना है' (हरे रामा हरे कृष्णा)**

**सुपर स्टार असलेला 'जतीनकाका' आपल्या त्याच त्या तुपकट ॲक्शन करत म्हणत असतो**

**'फूल आहिस्ता फेंको फूल बड़े नाज़ुक होते है'** ***(प्रेमकहानी)***

'अभिनय करते' असं म्हणणं जिच्यावर अन्याय करण्यासारखं आहे, ती जया म्हणत असते




**'मैंने कहा फूलोंसे हँसो तो**

**वो खिलखिलाके हँस दिये' (मिली)**

**"गेंदे का फूल; फूल होकर भी, फूल क्यों नही होता"** ***(चुपके चुपके)*****,**

"ये फूल खामोश रहकर भी अपनी रंग और खुशबू से बहुत कुछ कह जाते है" (सिलसिला) म्हणणारा अमिताभ म्हणत असतो



**'देखा फूलों को काँटों पे सोते हुए**

**देखा तूफ़ाँ को कश्ती डुबोते हुए'** ***(मजबूर)***

तर कधी ever happy असलेला 'जितू'भाई, जणू त्याचेच शब्द म्हणत असतो



**'मैं जहाँ चला जाऊं बहार चली आए**

**ओ महक जाए राहों की धूल,**

**मैं बनफूल, बन का फूल'** ***(बनफूल)***



हिंदी पार्श्वगायकांत, रागदारीचा बादशहा असलेल्या 'मन्ना'चं गाणं

**'फूल गेंदवा न मारो; न मारो,**

**लगत करेजवा में चोट' (दूज का चांद)**

किंतीही वेळा ऐकलं तरी समाधानच होत नाही.

एकाहून एक सुरेख गाणी असलेला 'बाझार' सिनेमा- त्यात फ़ारुख शेख आणि सुप्रिया पाठक गात असतातः

**फिर छिड़ी रात, बात फूलो की !**

**रात है या बारात फूलो की !!** ***(बाझार)***



कोवळे कुमार गौरव, विजयता पंडित म्हणत असतात

**'देखो मैने देखा है यह एक सपना**

**फुलो के शहर मे है घर अपना'** ***(लव्ह स्टोरी)***

कुमार गौरवच्या बाबतीत 'नशीब गांडू तो क्या करेगा पांडू' हे अगदी पटतं. बाप 'ज्युबिली' कुमार आणि बेट्याचे पंचवीस सिनेमे तरी आले की नाही कोणास ठाऊक.

बकुळफुलांप्रमाणे आठवणींत सदासतेज असणारी "तुझ्या पापाचा भरलाय घडा, तुला शिकवीन चांगला धडा", "काय घेणार? गरम की थSSअंSSड" म्हणणारी 'फुलराणी' भक्ती बर्वे आठवते. टपोऱ्या डोळ्यांची, हसतमुख 'फुल खिले है गुलशन गुलशन' मालिका सत्तरीच्या दशकात अत्यंत यशस्वी करणारी तब्बसूम आठवते. जुन्या जुन्या आठवणी आठवायला लागलं की अशाच एखाद्या उदासवाण्या, एकाकी संध्याकाळी आठवतात

**'वेगवेगळी फुले उमलली, रचुनि त्यांचे झेले**

**एकमेकांवरी उधळले गेले, ते दिन गेले'** ***(भवानी शंकर पंडित)***

**'पुजेतल्या पानाफुला**

**मृत्यू सर्वांग सोहळा**

**धन्य निर्माल्याची कळा'** ***(कवी बा. भ. बोरकर)***

आणि मग ती उदासवाणी सायंकाळ, हुरहूर लावत अधिकच गहिरी होत जाते.

तर कधी रात्री सुंदर सुंदर गाणी आठवत असतांना आठवतं

**'रजनीगंधा फूल तुम्हारे, महके यूँ ही जीवन में**

**यूँ ही महके प्रीत पिया की मेरे अनुरागी मन में'** ***(रजनीगंधा)***

आणि मग या सगळ्या अवीट गाण्याच्या आठवणींत


त्या फुलांच्या गंधकोषी सांग तू आहेस का (गीत - सूर्यकांत खांडेकर, संगीत - हृदयनाथ मंगेशकर)

हे त्या जगन्नियंत्याला आठवत, आळवत असतो...

**- संजय मेहेंदळे**

---




Happy Ganesh Chaturthi
from
Prabhakar Patil
and family
।। गणपती बाप्पा मोरया ।।

# Best Compliments




TAYION

BY MONTEE HOLLAND

**www.tayion.com**

# Happy Ganesh Chaturthi
# from
# Sharayu and Pradeep Kokate





# निळाई

निळ्या पाण्यामधे
निळे हे लाघव
निळा नवलाव
पाण्याचाच

निळ्या कमळाची
निळी भुलावण
राधेचा रमण
मोहवितो

असे निळेपण
पांघरून घ्यावे
तनमन व्हावे
घननीळ

सावळी निळाई
कशी मोरपंखी
मधुरशी डंखी
गोपिकांना

माझाच तो कृष्ण
वाटे प्रत्येकीस
झुले मोरपीस
गालांवरी

प्राणांचीच व्हावी
अशी ही निळाई
मोक्षाची कमाई
हीच असे?

- डॉ. वीणा शहा


Pillars of Strength and Character.
Premier Provider for Property and Casualty Insurance
HRTG LISTED NYSE
HERITAGE® Insurance
(855) 536-2744
www.heritagepci.com
WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC.
AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.

# Happy Ganesh Chaturthi
from

meijer

Authentikka
Indian Cuisine

# Happy Ganesh Chaturthi



from

Madhukar Mahajan

and family



And from

Sheetal Sonar & family in memory of loved ones

PASHANKAR TOURS

https://pashankartours.com/

+91 20 - 25511342 / 25511344 /
+91 9890977172 / +91 9860661166






# काटा रुते कुणाला



वसंतराव देशपांडेंनी स्वरबद्ध केलेले 'काटा रुते कुणाला' हे पद नाट्यवेड्या मराठी माणसाला माहित नाही असा माणूस शोधूनही सापडणे कठीण आहे.

नाटक एकाने लिहायचे आणि पदे दुसऱ्याने लिहायची हा प्रघात मराठी नाटकात काही नवीन नाही. शांताबाईंनी या प्रघाताप्रमाणे रणजित देसाईंच्या "हे बन्ध रेशमाचे" या नाटकाकरता तब्बल सहा पदे लिहिली. "काटा रुते कुणाला" हे कमालीचे लोकप्रिय झालेले पद त्यांनीच लिहिले. जरी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, गोविंद बल्लाळ देवल यांच्या काळात पदे आणि नाटके वेगवेगळ्या व्यक्तींनी लिहिण्याची प्रथा नव्हती तरी राम गणेश गडकरी यांच्या "एकच प्याला" या नाटकाची सगळी पदे विठ्ठल सीताराम गुर्जर यांनी लिहिली आणि ती ही गडकरी हयात नसतांना, हे फारच थोड्या रसिकांना माहित असेल. ग्वालेरच्या महाराजांसमोर "एकच प्याला" चा प्रयोग सादर करण्याचे नक्की झाल्यावर गुर्जरांवर पदे लिहण्याची जबाबदारी येऊन पडली. या अनपेक्षित जबाबदारीमुळे गुर्जर भांबावून गेले. त्यांनी पैठणी साडीला घोंगडीच्या तुकड्याच्या ठिगळाची उपमा या पदांना दिली.

रणजित देसाईंच्या "हे बंध  रेशमाचे" नाटकासाठी शांताबाईंनी लिहिलेल्या "काटा रुते कुणाला" या कारुण्यपूर्ण, हृदयाचा ठाव घेणाऱ्या पदाची पार्श्वभूमी मात्र खूप वेगळी आहे.

भारत -पाकिस्तान फाळणीचा काळ होता. त्यावेळी श्रीकांत आणि अमीर हे दोघे जिवलग मित्र लाहोरमध्ये राहत होते. दोघांची घनिष्ठ मैत्री जुळण्याचे कारण त्यांचे क्षेत्र. दोघेही पट्टीचे गायक होते. बऱ्याच मैफिली ते दोघे एकत्र येऊन रंगवीत असत.

भारत -पाकिस्तान फाळणी सुरु झाली. सगळीकडे लूटमार, जाळपोळ, दंगलींना ऊत आला होता. श्रीकांतने भारतात जाण्याचा निर्णय घेतला. त्याचा वियोग सहन करावा लागेल या विचाराने अमीर व्यथित झाला. श्रीकांत भारतात जाण्याच्या आपल्या निर्णयावर ठाम होता. त्यासाठी तो लाहोरच्या स्टेशनवर भारतात परतण्यासाठीची तिकिटे घेण्यासाठी गेला. तो स्टेशनवर असतानाच दंगल उसळली. क्षणार्धात दंगलीने रौद्र स्वरूप धारण केले. श्रीकांतला घरी जाणेही दुरापास्त झाले. दंगलीचे लोण वणव्याप्रमाणे संपूर्ण शहरात पसरले. आपले घर, पत्नी, मुलगी श्यामला या दंगलीत सापडतील या भीतीने श्रीकांत हतबल झाला पण तो घरी परतण्याचा धोका पत्करू शकत नव्हता.
श्रीकांतच्या घरापर्यंत दंगल पोहोचली. दंगलीत सामील असलेले गुंड श्रीकांतच्या घरात शिरले. त्यांनी श्रीकांतच्या एकट्या असलेल्या पत्नीवर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. सगळी शक्ती एकवटून तिने गुंडांचा प्रतिकार केला परंतु थोड्याच वेळात गुंडांनी तिला नामोहरम केले. तिचा प्रतिकार संख्येने जास्त असलेल्या गुंडांसमोर फार काळ टिकू शकला नाही. गुंडांना बधण्याअगोदर स्वतःचे शील भ्रष्ट होऊ  नये म्हणून तिने स्वतःला संपवले. छोटी श्यामला पुरती भेदरून गेली होती. ती आपला जीव वाचविण्यासाठी एका अंधाऱ्या कोपऱ्यात लपून बसली होती. गुंडांचे तिच्याकडे लक्ष्य गेले नाही.

एवढ्यात श्रीकांत अजून घरी का परतला नाही हे पाहण्यासाठी त्याचा जिवलग मित्र अमीर घरी आला. घरातले दृश्य पाहून अमीर अवाक झाला. जमिनीवर श्रीकांतच्या पत्नीचे - अमीरच्या भाबीचे -पडलेले प्रेत त्याला दिसले. अमीरची भाबी केव्हाच गत:प्राण झाली होती. हे दृश्य पाहून अमीरला प्रचंड वेदना झाल्या. त्याचे हृदय पिळवटून निघाले. इतक्यात भीतीने थरथर कापत कोपऱ्यात लपून बसलेली छोटी श्यामला अमीरचाचाला पाहून बाहेर आली, तिने अमीरला घट्ट मिठी मारली आणि "चाचा, मुझे बचाव, मुझे बचाव" असा टाहो फोडून अमीरला बिलगली. गुंड आपल्यालाही मारायला कमी करणार नाही या भीतीने अमीरने श्यामलाला उचलून कडेवर घेतले आणि तो जीव घेऊन त्याच्या घराकडे पळाला.

थोड्याच वेळात दंगल शमली. दंगल कमी होताच श्रीकांत सुसाट वेगाने घराकडे निघाला. श्रीकांत घरी येईपर्यंत गुंडांनी श्रीकांतचे घर पेटवून दिले होते. पेटलेले घर, पत्नी, मुलगी घरी नाही गुंडांनी हैदोस घातलेला हे दृश्य पाहून श्रीकांत पुरता खचून गेला. सगळीकडे दहशत, गुंडगिरी आणि भीतीदायक परिस्थिती होती. बायको, मुलगी कुठेच दिसेना त्यामुळे श्रीकांतची अवस्था दयनीय झाली, तो वैफल्यग्रस्त झाला. बायको गेली, मुलगी गेली, घर गेले, आता उरले काय? या विचाराने श्रीकांत गळून गेला. सगळे काही गमावलेला श्रीकांत अक्षरशः रिकाम्या हाताने भारतात आला.

इकडे श्यामला अमीरच्या घरी सुरक्षित होती. ती अमीरच्या मुलांबरोबर वाढत होती. पंचवीस वर्षानंतर श्रीकांतची आणि अमीरची भारतात भेट झाली. मैफिलीत भाग घेण्यासाठी अमीर पाकिस्थानातून भारतातल्या एका मोठ्या शहरात आला होता श्रीकांतही त्या मैफिलीत हजर होणार होता. मैफिलीत अमीरला समोर पाहताच श्रीकांत लालबुंद झाला, तो अमीरला नको नको ते बोलला, त्याने अमीरवर शब्दांचे कठोर वार केले. अमीरच्या आयुष्यात त्याने त्याच्यावर घेतलेले तोंडसुख अनुभवले नव्हते. श्रीकांतने त्याचा 'न भूतो न भविष्यति' असा पाणउतारा केला. श्रीकांतची अशी समजूत होती की अमीरनेच आपल्या बायकोला, मुलीला मारले. प्रत्यक्षात अमीरने श्रीकांतच्या मुलीला - श्यामलाला - तळहाताच्या फोडाप्रमाणे जपून मोठे केले होते. एवढेच नव्हे तर तिला प्रज्ञावान गायिका बनविले होते. तिला घेऊन तो भारतात यापूर्वीही येऊन गेला होता परंतु दुर्दैवाने श्रीकांतची त्याची भेट होऊ शकली नाही. आताही श्यामला अमीरबरोबर भारतात आली होती.

आपल्या आयुष्यात असे विचित्र, हृदयाचा ठाव घेणारे अनेक प्रसंग येतात परंतु रणजित देसाईने हा प्रसंग अत्यंत कुशलतेने , हृदयस्पर्शी भावनेने चितारला आहे. अमीरच्या तोंडी त्यांनी

***"लोग काटोकी बात करते है ,***
***हमने तो फुलोंसे जख्म खाये है !!***

हे वाक्य घालून या प्रसंगाचे अप्रतिम सादरीकरण केले आहे.

शांताबाईंनीही मोठ्या समर्पक शब्दात या भावनेचे मूल्यमापन त्यांच्या


***"काटा रुते कुणाला, आक्रंदतात कोणी ,***
***मज फुलहि रुतावे, हा दैव-योग आहे !!***

या पदामध्ये केले आहे .

\- **बाळकृष्ण पाडळकर**

---

# गणपती बाप्पा मोरया







October 6, 2023




December 1, 2023

For tickets go to:

**https://parashare.com/?s=detroit**


C4D
MORTGAGE
C4D MORTGAGE COMPANY, LLC
OPENING DOORS — CLOSING LOANS
WHY C4D MORTGAGE COMPANY?
Best in business since 2003 due to our dedication in customer service.
Lowest rates on the market.
5-star rating on Zillow.
Exceptional team of educated, licensed and experienced loan officers.
Refinance, purchase, or cash-out loans.
Zero closing costs.
Call today for a free consultation
(586)421-5092
WWW.C4DMORTGAGE.COM
NMLS #151261

# Thrill

Whooosh! The roller coaster dipped and dived.

“This is not the best way I want to spend my time!” I yell to my cousin.

“Me neither!” She screams back. This is a story from a few months ago. We had been waiting for this trip for several months, ever since my cousins came from India for the holidays. But we hadn’t expected it to go so differently than we thought! We were hoping for a fun, amazing week, going on a bunch of different rides, smelling the street food, pausing to look at the map to find our way, yet get hopelessly lost, just for fun - wander through the streets like maniacs, choosing select rides because of our dumb ‘fast pass’. The fast pass did let us skip the lines, but the catch was that you could access the fast lane only at designated time. The slots were open for an hour, and anytime during the hour, you could go through the line in the fast lane. Except, you could only go through the fast lane once a day, but you could stand in the endless line of pushing people, struggling to find their way in. Yup, it was tons of fun!
No no, it wasn’t so bad. We did get to go on tons of rides, eat a bunch of junk food, and play games the entire day. The only problem was the ‘Rip Ride Rockit’!




The ‘Rip Ride Rockit’ was this ginormous roller coaster that swerved and slid. Lasting for 5 minutes, it was one of the main attractions at the theme park. Tourists crowded around it, all hoping to get a chance to go first. Thanks to our fast pass, we were able to skip the line. As we climbed up the stairs, we figured out why it was called the ‘Rip Ride Rockit. As we went on this crazy, thrilling coaster, music of our choice would be playing from speakers close to our ears. This added some excitement to our joy as this would be the first proper roller we had ever ridden.

We didn't know what to expect, but we knew that whatever it was it had to be good, right?

Wrong! I don't think that I have ever been more wrong in my life.
To start off, most roller coasters go up at an angle. Not this one! This one climbed straight up, like an ant scaling the wall. All the blood rushed to my head as I realized the terrible mistake that I had made…

As we neared the top, a feeling of dread whooshed into my stomach, setting in the queasy part of my stomach. I took a deep breath and let it out, trying to expel the feeling, but it was of no use. 'Okay' I thought, 'If I'm going to do this, I'm not going to do it scared. I'm going to do it bravely.' Alas, as the ride started, any trace of courage vanished from my mind, and was replaced with a single thought…"Aaaaaaaahhhhhhhh" My mouth was following my mind, a single shrill scream protruding from my lips, my eyes clamped tight, my handles clutching the bar so tightly that my knuckles and fingers had turned as white as a ghost in the moonlight. I chanced a glance at the ride and what I saw shocked me. We were upside down, and turning fast. Everything became a blur as we speeded back down.

Back on the ground, I had shut my mouth, for the fear that I would throw up if I opened it. A few minutes later, when I felt it was safe, I opened my mouth and tried forming a sentence. All that came out was "That was.. That was… Spectacular." In the end, I was glad that I went on the ride. It changed me in more ways that I could remember. It made me braver, and less reluctant to try new things. As I left the park, I felt that Disneyland was indeed a very magical place.

**- Tavishi Dixit**

---





# Looking to Buy or Sell Your Home?

*Call Priyanka Dabhi today for all your real estate needs—buying, selling, or even just looking for a home.*

kw

**Priyanka Dabhi**
KW Professionals
REALTOR®

(734) 331-5666
priyanka4realestate@gmail.com
www.pdabhi.kw.com

*Wishes you all a very*

*Happy Ganesh Chaturthi*




# Title boxing club Rochester Hills,

## *Alpana Paranjape*

*Wishes you all*
*Happy Ganesh Chaturthi*




Travel mugs, bottle, coffee mugs
CUSTOMIZE YOUR APPAREL
T-Shirt, Hats, Sweatshirts, Golf Shirts, ETC.
-Embroidery
-Screen Printing
-Full-Color Printing
-Vinyl Names & Numbers
SAMI'S
ENGRAVING
& GIFTS
PERSONALIZED HOLIDAY GIFTS, & MORE...
Trophies & Medals
Plaques
Desk Clock
Full Color Mugs
Cutting & Serving Board
Rosewood Finish Martini Set
3-Piece BBQ Set
Corporate Gifts, Custom Engraving, Promotional Products
Visit us online or in store for more gift options and varieties
samisgifts@gmail.com | (248)-250-4931 • www.samisgifts.com • 4935 Rochester Rd, Troy, MI 48085


SUGUNA'S
Beauty Touch
Scan the code to download app and book your first appointment
Facials
Threading
Hair Styling
Waxing
Mehendi
and more...
Troy, MI


Sistar Mortgage
Company

A Nationwide Lender

## Wishes you all a very
# Happy Ganesh Chaturthi



# माझ्या नजरेतले एम एम डी



स्टेट मिशिगन, शहर डेट्रॉईट आणि या शहरांमध्ये चालते एम. एम. डी.! अमेरिकेतील भारतीयांनी भारतातील संस्कृती जपण्यासाठी व अमेरिकन भारतीयांना सर्व भारतातील महत्त्वाचे सण कसे साजरे होतात, उत्सव कसे साजरे करतात याचा अनुभव येण्यासाठी व ते तेवढ्याच तयारीने साजरे करण्यासाठी. एवढेच नव्हे तर जे नवीन जनरेशन आहे त्यांची मुलंमुली यांना भारतामध्ये काय सण आहेत, ते कसे साजरे होतात याचे सरळ दर्शन या निमित्ताने होते, कारण ते आता येथील रहिवासी आहेत.

'त्यांना भारतीय संस्कृतीचे दर्शन होईलच असे नाही'. असे म्हणताना मनात एक उत्तर तयार आहे ते म्हणजे आजकाल ऑनलाइन सर्व माहिती मिळते. पण आपल्याला सर्वांना हे ठाऊक आहे की इन्फॉर्मेशन म्हणजे नॉलेज नाही म्हणून ते साक्षात अनुभव घेतल्यामुळेच मिळते आणि हे कार्य एम एम डी सदैव करत आहे. जसे की एक 'स्नेहबंध' नावाचे मासिक प्रत्येक मौसमात ते काढतात. त्यामध्ये वेगवेगळे लेख प्रकाशित होतात व येथे येणाऱ्या प्रत्येक भारतीयांना लगेच वाचून एमएमडीच्या कार्याबद्दल माहिती मिळते. हा खरोखर स्तुत्य असा उपक्रम आहे.

आता महत्त्वाचे सण म्हणजे गणेशोत्सव, दीपोत्सव, होली उत्सव, नूतन वर्षाचे स्वागत, मकर संक्रांत, गुढीपाडवा, डोहाळजेवण, नामकरण, संगीतोत्सव ऑर्केस्ट्रा, गाजलेले सिनेमे, नाटक - येथील नागरिकांना (भारतीयांना) दाखवण्याची सोय सुविधा असे अनेकविध कार्यक्रम एम.एम.डी करते. एखादं नाटक डेट्रॉईटकरांना दाखवायचे असेल तर अनेक पापड बेलावे लागतात आणि ते येथील एम एम डी चे आजी आणि माजी अध्यक्ष उपाध्यक्ष, सचिव सर्व कार्यकर्ते व इतर सर्व तरुण मंडळी बंधू भगिनी सगळेच मिळून एकजुटीने करतात.

हे जरी सातत्याने होत असले तरी प्राथमिक स्तरावर काही महत्वाच्या व्यक्तींना पुढाकार हा घ्यावाच लागतो. आपल्याला हे माहित आहेच आणि हे कार्य येथे श्री व सौ राचमले १००% समर्पण भावनेने करतात. एक असं नाव की सर्व भारतीयांना अभिमान वाटावा असे खूप 'ग्राऊंडेड' सहज, सरळ मनमिळावू स्वभाव आणि दोघे मिळून हे करतात. हे म्हणजे खरोखरच भारतीयांच्या दृष्टीने दुग्धशर्करा योग असे म्हणावे लागेल. श्री. अविनाश राचमाले व सौ. हेमा राचमाले दोघेही भारतीयांना येथे घट्ट बांधून ठेवण्याचे कार्य करत आहेत. नुकताच म्हणजे हेमाताईंना 'महाराष्ट्र गौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. मला हे जेव्हा समजले तेव्हा मनस्वी खूप आनंद झाला. मी त्यांचे अभिनंदन व्यक्तिशः केलेले आहेच पण या लेखाच्या निमित्ताने सुद्धा हेमा ताई आपले खूप खूप अभिनंदन! एकाच कुटुंबातील काही मोजक्याच व्यक्तींना एकत्र आणून काही कार्यक्रम करावयाचे म्हटले आणि तेही भारतातले ! आपल्याला ठाऊक आहे की ते एक अवघड काम असते पण आपल्याला सर्वांना आश्चर्य वाटेल अमेरिकेमध्ये या उभयतांनी अनेक राज्यातून, जिल्ह्यातून, वेगवेगळ्या कुटुंबातून ज्यांचे संस्कार, संस्कृती, भाषा, दैनंदिनी, विचार सर्व काही वेगवेगळे असताना सुद्धा हे सर्व कार्यक्रम हे उभयता सहज निभावून नेतात म्हणून यांना मला व्यक्तीश: माळेतला मेरुमणी असे म्हणावेसे वाटते - एम .एम .डी. म्हणजे दोरा, सर्व कार्यक्रम म्हणजे

मणी आणि जेव्हा मणी आणि दोरा मिळून माळ बनते त्याला आपण घट्ट बांधून ठेवण्यासाठी मेरुमणी तयार करतो आणि ह्या माळरूपी मण्यांना एकत्र बांधून ठेवण्याचे काम तो करतो. मी प्राध्यापिका प्रोफेसर डॉक्टर श्रीमती सी एस पाटील (बिरादार) प्राचार्य , माझ्या मोठ्या मुलाकडे डिट्रॉइडला मे महिन्यामध्ये आलेली आहे आणि येथे आल्यानंतर हेमा ताई यांच्यामुळे दोन अतिशय उत्कृष्ट कार्यक्रम एक म्हणजे म्युझिकल ऑर्केस्ट्रा आणि दुसरं म्हणजे त्यांच्या स्वगृही बासरी वादन हे दोन अतिशय आखीवरेखीव आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम मला पहावयास, अनुभवयास मिळाले, श्री व सौ रेणुका ओक यांच्या स्वग्रही त्यांच्या नवीन घराची वास्तुपूजा करण्याचा योग आला. त्यानंतर 'आमने-सामने' नाटक एमएमडी मुळेच मला पहावयास मिळाले अमेरिकेमध्ये. आणि ह्या सर्व कार्यक्रमांमध्ये औरंगाबादकरांची आणि इतर भारतीयांची भेट झाली आणि खूप समाधान व आनंद झाले जणू काही मी भारतामध्येच आहे असा मला भास झाला.
हा जो आनंद आहे, हा कौटुंबिक फिलिंग चा जो भाग आहे, हे एम एम डी इथे करत आहे ही एक वाखाण्यासारखी गोष्ट आहे नाहीतर अमेरिकास्थित भारतीयांना विरंगुळा म्हणून काहीच उरत नाही आणि एम एम डी हे कार्य करत आहे आणि म्हणूनच इथल्या भारतीयांना पूर्ण भारताची संस्कृती जपण्याचं श्रेय मी एम .एम. डी .ला देते आणि मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांना, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिवांना (आजी आणि माजी), सर्व सहभागी होणाऱ्या भारतीयांना मी खूप खूप शुभेच्छा देते आणि एम.एम.डीच्या पुढच्या वाटचालीस शुभेच्छा देऊन थांबते!

धन्यवाद.

**प्राचार्य (प्रोफेसर)**
**श्रीमती सी. एस. पाटील**
**बिरादार औरंगाबाद 9890862804**

---




# Roshan Pathre
# Real Estate Agent

Contact me today for all your Real Estate needs!
Phone: (248) 925-8524
Email: roshanpathrerealestate@gmail.com

MPB MICHIGAN POWER BROKERS

REALTOR®

Roshan Pathre
Licensed Residential & Commercial Realtor®
Michigan Power Brokers

## Reshma Buch

Cell :734-262-0652 | **Email** :reshmabuch@yahoo.com

**Location :**
17714 Rolling Woods Circle, Northville, MI, 48168 ,Northville

### Learn the Elegant and Royal Indian Classical Dance Form of KATHAK



Learn the Elegant and Royal Indian Classical Dance Form of KATHAK at THIRAK KATHAK DANCE


STUDIO by Reshma Buch, Kathak Visharada. Kathak Teaching inspired by Indian culture, tradition and discipline.

- Professional & Experienced
- Small Batches
- Private 1-on-1 lessons also available
- Ages 5 to 55+ years

# Sneha Patel and family

*wishes you all*



SAT Math & English Test Prep Classes

The EDucation ENrichment Center

We have experienced teachers provide a structured approach to help students learn new math concepts, improve language arts abilities, and boost test scores

**ACT/SAT Test Prep**


- ACT Prep course
- SAT Prep course
- Test practice and reviews

**Math**

- K-5 Math
- Pre-Algebra
- Algebra I
- Algebra II
- Geometry
- Trigonometry
- Pre-Calculus
- Calculus

**English**

- K-12 Language Arts
- Grammar
- Reading Comprehension
- Writing
- Vocabulary




www.ed-en-center.com
248.528.1455
2328 Livernois Road, Troy, MI 48085

# Happy Ganesh Chaturthi

## from

# Rajesh Pawar

## Chairman & MD

mikro
driven by innovation.



# तुझ्या माझ्या गोष्टी

घड्याळात सकाळचे ६-६:३० वाजले असतात. वातावरण पावसाचं असल्यानं कुंद सकाळ झालेली असते आणि खिडकीतून दूरवरच्या शंकराच्या मंदिरातल्या शंख आणि घंटेचा आवाज येत असतो. मातोश्रींची किचन मध्ये काहीतरी चुळबुळ चालू असते आणि मी रजईत स्वतःला पूर्ण गुंडाळून घेऊन कधी घड्याळाच्या काट्याकडे, तर कधी सिलिंगच्या फॅनकडे बघत मातोश्रींच्या (ओरडून) उठवण्याची वाट बघत असतो.

तसं जवळपास सर्वांकडे तुझ्याचसाठी राखीव असलेलं एक स्पेशल पातेलं असतंच. त्यात कपभर नळाचं पाणी घेऊन ते पातेलं शेगडीवर ठेवलं जातं. आणि उकळू लागतं पाणी. समोर मातोश्री तुझी पावडर आणि साखरेचा डब्बा घेऊन तयारच असतात. पाणी उकळत असतं रटरट. त्यात लहान लहान बुडबुडे तयार होऊ लागतात आणि फुटूही लागतात. बुडबुड्यांच्या निर्मितीची आणि फुटण्याची गती मग वाढू लागते. (म्हणे 'पाण्याला उकळी येते' म्हणतात ह्याला) आणि मग मातोश्रींच्या हातून दोन चमचाभर तुझी पावडर आणि तेवढीच साखर त्या बुडबुड्यांत मिसळली जाते.

क्षणार्धात त्या पाण्याचा सगळा ताबा तू घेतोस आणि सर्र्कन रंगच बदलून टाकतोस तू त्या बुडबुड्यांचा. एक प्रकारचा जणू जीवच ओततोस तू त्यांत. त्या मघाच्या निव्वळ पाण्याचा, आता लाल रंगाचा 'तू' होऊ लागलेला असतोस. बाजूला मातोश्री खणखण आवाज करत आलं ठेचू लागतात, ते आलं बिचारं, मातोश्रींच्या ताकदीपुढे मिनिटभरात हार मानून पेस्ट बनून जातं, ते ठेचलेलं आलं -हिरव्या वेलचीच्या दाण्यांसोबत- मिसळलं जातं तुझ्यात. खमंग वास घरभर पसरू लागतो.

“चहा ठेवलाय का ग??” या वासाने आणि मघाच्या आलं कुटण्याच्या आवाजाने उठलेल्या बाबांचा आतून आवाज येतो.

“हो! उठा आता!!!” म्हणता म्हणता मातोश्री तुझ्यावर दुधाचा अभिषेक करत असतात.

“अरे ए टोणग्या.. उठ आता!!!!!!” आईची आतून डरकाळी येते आणि मग रजईतून निघून माझे पाय आपोआप दात घासण्यासाठी बेसिनची वाट चालू लागतात.

तिकडे त्या दुधास तुझ्या रंगात सामावून घेत तू पुन्हा उकळू लागलेला असतोस. आणि मग थोड्याच वेळात चवताळून त्या पातेल्याबाहेर यायचा तुझा प्रयत्न सुरु होतो. पण मातोश्रींच्या चपळाईला हरवणं तुला थोडी जमतंय. तू पातेल्याच्या अगदी कड्यापर्यंत पोहोचताच मातोश्री पातेलं शेगडीवरून उचलतात आणि तुला ओतू लागतात त्या पांढऱ्या कपात.

उकळता, वाफाळता अन् फेसाळता तू अगदी ऐटीत त्या पांढऱ्या कपात विसावतोस आणि तयार होतोस जग जिंकायला. बाबांची साखरझोप उडवायला. काल रात्री खेळून आल्यावर जमिनीवर टाकलेले कपडे मी अजूनही उचलले नसल्याने

आईला मला ओरडायची (आयडिया आणि) ताकद द्यायला. आणि माझा तो ओरडा खाल्ल्यावर मूड पुन्हा ठीक करायला! तूच करू शकतोस हे सगळं.

मग कपभर तुला सोबत घेऊन आईबाबांच्या आत काहीतरी हिशोबाच्या गोष्टी सुरु होतात. आणि (बाबांच्या मते अजूनही) मी लहान असून मला त्या गोष्टी ऐकायची परवानगी नसल्याने मला हॉलमध्ये पाठवले जाते.



मग उरतो फक्त तू आणि मी. तुझ्यासोबत त्या खिडकीत बसून खालून जाणाऱ्या गाड्या बघत गप्पा मारायला अजूनही का एवढी मज्जा येते ते देवासंच (आणि कदाचित तुलासुद्धा) ठाऊक! हॉलच्या खिडकीत ग्रीलला लटकणारे पावसाचे थेंब बघत आपण दोघं खिडकीजवळच्या पलंगावर स्थानापन्न होतो, आणि मग सुरु होतात ती प्रश्नोत्तरं, जी तू सोडून कोणालाच मी विचारू शकत नाही आणि सुरु होतात त्या गप्पागोष्टी ज्या तू सोडून मी कोणालाच सांगू शकत नाही.

तुझ्या आणि माझ्या गोष्टी!!

**- निरज आळतेकर**

---




# Happy Ganesh Chaturthi

***from***

**Bharati Mehendale and family**

**Hema and Devdatta Kulkarni and family**

# Happy Ganesh Chaturthi from



# Shri & Shashi Thanedar



Century 21 Town & Country

Selling or buying a home is perhaps the single largest transaction most of us will make in our lifetime.

Allow me the privilege of helping you with this decision.



***Prasanna Mohanachandran***

***REALTOR***

Office : (248) 524-1600
Mobile: (248) 670-1943
Fax : (248) 524-1427
***pm.tcagents@gmail.com***

**Call now (248) 670-1943 (Cell)**

KARMA ENTERTAINMENT LLC

Mukund & Kanchan Wankhede
www.karma-entertainment.com
(313)-316-9132

Indian Fusion Show Production
Stage Lighting Consultation
Audio & Video
Stage Light Plan & Execution


FOR ALL YOUR MORTGAGE NEEDS
VM
VEMA MORTGAGE LLC
SEBASTIAN GEORGE
Mortgage Broker
Contact me for a free rate quote
1-877-800-VEMA (8362)
saaby74@vemamortgage.com
We are open 24 X 7, 365 days a year


kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!
REALTOR®, KASHMIRA DESAI
YOUR METRO DETROIT EXPERT
View What is ACTIVE, PENDING & SOLD in your
Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com
Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955
realtor.kashmira@gmail.com
SRS
Each Keller Williams Office is
Independently Owned and Operated


V2SOFT
GLOBAL TECHNOLOGY SOLUTIONS
TECHNOLOGY | IT/ENGINEERING RESOURCES | OUTSOURCING
APP DEV | DIGITAL SERVICES | TESTING SERVICES INCLUDING AI TESTING
BLOCKCHAIN SOLUTIONS | CLOUD & MOBILE
16 OFFICES
6 COUNTRIES
MINORITY CERTIFIED BUSINESS
CERTIFIED IN CMMI LEVEL 3 AND ISO
WWW.V2SOFT.COM
INFO@V2SOFT.COM

# “Yes Day”

“Yes Day” – sounds like an interesting name for a movie, right?

This movie is all about an exciting family, but the family is not the usual one. There are 3 crazy kids in this family: the eldest, Katie, the middle child Nando and the youngest one, Ellie. The kids in this family think that their mom is a fun killer, but little do they know that their mom is fun. So, one day after seeing how much her kids hate her, she decides to challenge them. She decides that her family will be having a “Yes Day”.  A ‘Yes Day’ is where the parents have to say “Yes” to anything their kids ask.




Katie is looking forward to attending a big concert alone with her friends. Of course, her mom says “No”, so the bet is if the parents get through the whole thing without saying “No”. Katie certainly can’t go by herself. But if the parents do say yes, even once, Katie can go by herself. After hearing what a ‘Yes Day’ was, Nando and Ellie didn’t need a bet to accept the challenge. But there are some ground rules to this day. In the first place,” Yes Day “would need to be earned. After following all the rules with no remainder, the day finally came. The kids decide that they will have 5 big “ask”s. The first one was to eat a 20-pound sundae, but if they ate it under 30 mins it's free but if they don’t, it’s a $100 charge. But in the end the dad carried on the task and finished it before the last second. After that the kids revealed their second ask: a car wash with windows down. At first the mom is about to say No but then she knew that she would lose the bet, so they decide to go. After a *refreshing* car wash the kids reveal their third ask: a water balloon fight. There are 4 teams. There is mom’s team, then the dad’s team, then Katie’s team and then Nando and Ellie’s team. After their dad’s team gets eliminated, the kids team up to get their mom but before they know it their mom gets Nando out and then Katie. But after a horrific accident caused by getting attacked by birds, their dad has to go to a hospital. After finding out their dad is fine, the kids express their fourth big ask is to go to a roller coaster park. But then, after getting into an argument with Katie, her mom decides to win her a prize. But then she gets into a fight with a lady who was trying to win the same prize.

After things get out of control, they are taken to the police station. Then the kids secretly leave, Katie goes to the concert while Nando and Ellie do the fifth big ask: throw a big party in the house. After getting out of jail, the parents go after the kids. The dad goes after Nando and Ellie while the mom goes after Katie. Meanwhile at the concert Katie gets lost. Her phone runs out of battery. She panics and tries to find a charger. But due to her luck no one seems to help a lost teen girl during one of the biggest concerts in their life. But the mom goes on the stage yells “Katie” while Katie runs up and hugs her mom. Meanwhile at the house the dad has trouble trying to stop a house full of kids. So, he decides to try something fun. Their fun cleaning up party lasts only for 30 mins. After everybody gets home, they decide to end the day with some family quality time. And that’s the story of the adventurous movie “Yes Day.” This is one of my favorites. What I also loved about this movie is that the transitions between scenarios are so smooth that you don’t even realize it! And for all these reasons I like Yes Day and I just hope that my parents agree to it “Some Day”…..




- **शौनक विपट**




Namaste Flavours




# FinesseAcademy

"Believing without limits."

*Online & In Person Classes That Help Your Child Succeed*

The present day life of a student is filled with challenges. Growing preteens and teens, who already experience enormous physical and hormonal changes within them, undergo several cognitive, social and emotional changes too when they enter middle school and high school.

Finesse Academy programs are designed to help students identify their strengths and fortify their weaknesses, while developing a true sense of confidence to achieve their goals



## CONFIDENCE BUILDING

Self-confident people have qualities that everyone admires.



## TIME MANAGEMENT

Efficient time management is the key to getting the most out of the day.



## SUCCESS

Preparing for your journey to success involves getting in the right mindset, and a commitment to stay with it.

**ONE-ONE COLLEGE PREP COUNSELING**

For more information:

**www.finesseacademy.com**

**Contact - Vidhi Ghosalkar @ 313.283.4343**


Great Cars.
Great Sales.
Great Service.
Two great locations with more brands ready to serve you!
SERRA
FORD ROCHESTER HILLS
Ford
serrafordrochesterhills.com
2890 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.852.0400
SERRA
BUICK GMC ROCHESTER HILLS
BUICK GMC
serrabuickgmcrochesterhills.com
855 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.651.5500

# गेले पोहायचे राहुनी

'मला पुढे सरकायचंय् पण ते इंस्टिंक्टच नाहीये"
"आहे, तुम्हाला instinct आहे, पण ते पाण्यातून बाहेर यायचे आहे". कमालीच्या संयमाने माझा 'पोह'मास्तर मला म्हणाला.(माझ्या मना, दगड बन...). अमेरिकेत हा धडा चालला होता म्हणून बरं, भारतात तलावाला कुलूप घालून मास्तरांनी कधीच त्या जागी 'इथे हलव्याचे दागिने करून मिळतील' अशी पाटी लावली असती!

मला पाणी प्रचंड आवडतं. प्यायला, खेळायला, भिजायला, बघायला... जवळून चालायला. मुंबईत लहानपण गेल्यामुळे पावसात (स्वेच्छेने) भिजणं हा पावसाळ्यात परमानंदाचा क्षण वाटायचा. (नंतर कॉलेज बुडवून चालणार नाही ही वेळ आल्यावर पावसाला थोड्या शिव्याही घातल्या ते वेगळं).
चौपाटीवर मुसळधार पावसात भिजणं, वाटेत चहाच्या टपरीवर वाफाळता चहा पिणं, घरी आल्यावर घाईघाईने आंघोळ करून, शेजारीपाजारी कोणी गरम वडे, भजी किंवा आल्याचा चहा करत असेल तर त्यांचा पाहुणचार घेणं, आणि त्या गोष्टीला आता ३० वर्षे होत आली असली तरी अजूनही, कुठेही पाऊस पडला की त्या आठवणींनी जाहीरपणे हळहळायचं हे माझं एक -अस्सल मुंबईकर म्हणून - ब्रीद आहे.
मात्र त्या उभ्याने भिजण्याचा, तलावात आडव्याने भिजण्याशी काहीही संबंध नाही हे कळायला बराच वेळ लागला.

'पाण्यात पडल्याशिवाय पोहता येत नाही' या म्हणीत फारसं तथ्य नाही, कारण पाण्यात पडलंच नाही तर पोहायची गरजच भासत नाही!!! 'पाण्यात पडलं की आपोआपच हातपाय चालू लागतात, पोहणं अगदी नैसर्गिक आहे' हे माझ्या बाबतीत सपशेल खोटं ठरलं! पडल्यापडल्या (पाण्यात) मी बाजूबंद ऊर्फ फ्लोटीधारित माझ्या हातांनी मास्तराला घट्ट धरलं. तो मला, 'सुटी हो', सांगतोय् आणि मी त्या कुठल्याशा गाण्याप्रमाणे सांगायचं तर 'ये पोह पोह के धागे, तेरी उंगलीयोंसे जा उलझे' या अवस्थेत त्याला पकडून पाण्यात लटकणं, तडफडणं वगैरे वगैरे चालू ठेवलं.

माझ्या शेजारच्या गल्लीत अजून एक भारतीय बाई नखशिखांत नसली तरी जानूशिखांत कपडे घालून त्याच तलावात पोहण्याशी झगडत होती. तिची मास्तरीणदेखील जेरीस आली होती. दोन्हीही शिक्षक या आंतरराष्ट्रीय समस्येला तोंड देऊन वैतागले होते. तास संपल्यावर कमालीच्या संयमाने 'तुमच्या देशात स्त्रियांना पोहायला परवानगी नाही का?' असा चाचरत दोघांनी आम्हाला प्रश्न केला. "पुराणापासून आमच्या स्त्रिया लीलया जलविहार करतात, आम्हा दोघींच वैगुण्य देशाच्या माथी मारू नका" हे मला ठसक्यात ऐकवायचं होतं पण नाकातोंडातून पाणी येत असल्याने तो ठसका जाऊन फक्त

ठसका लागला!

अर्थात् पुराणातली वांगी पुराणात राहू देत, मोठ्या शहरांत - निदान पन्नासेक वर्षांपूर्वी तरी

१) कृत्रिम तलाव बांधायला जागा

२) तिथे पोहणं परवडेल इतपत आर्थिक स्थिती

आणि हे दोन्ही लहानपणीच जुळून आलं तर

३) तिथे आणणं व सोडणं हे उपद्व्याप करायला घरच्यांना वेळ मिळणं

या ३ कारणांनी माझ्या माहितीत बऱ्याच भारतीयांना पोहायला शिकायला उशीर झाला. हे सगळं लहानपणीच जमलं तर ठीक नाहीतर मोठेपणी ‘तोकडे कपडे घालायची लाज’ या कारणास्तव अनेक स्त्रियांनी ती वाट धरलीच नाही. मग वाढत्या वयात काही बंधनं शिथिल झाली, केली किंवा वाटेनाशी झाली की भीती दत्त म्हणून उभी ठाकतेच की! मी याही बाबतीत अपवाद आहे किंवा certified ढढ्ढोबा आहे म्हणा! लहानपणी मला पोहता याव यासाठी वडिलांनी जंगजंग पछाडलं पण मी ‘लाथ मारेन तिथे पाण्यातून (स्वत:ला) काढेन’ हे धोरण अनुसरलं होतं. बाळाचे पाय पा(ळ)ण्यात दिसतात ते असे!

बाकी पोहणं हे कितीही नैसर्गिक व प्रचलित असलं तरी त्याकडे स्पर्धा म्हणून बघायला जवळजवळ एकोणिसावं शतक उजाडलं. त्यातही स्त्रीपुरूष ही वर्गवारी होतीच. नेहमीप्रमाणे या स्पर्धांत भाग घ्यायला स्त्रियांना काही दशकं थांबावं लागलं. मग मात्र त्यांनीही बाजी मारली. तेव्हां हा भेद माझ्या न पोहण्याच्या मुळाशी आहे असं मुळीच नाही.

मी या कलेची बरीच याचना केली आहे पण’ मयि सा विरक्ता’! ती काही मला वश होत नाही.
मी नाद सोडूनच दिला असता पण माझी मुलगी लहान असताना, तिला पोहायला शिकवायचं ठरवलं. म्हणजे मी ठरवलं, शिकवता धनी वेगळाचि. तिथे एका पालकाला बालकाबरोबर पाण्यात जावं लागतं. आता काय करावं? पण तिथे गेल्यावर जाणवलं, बऱ्याच मनुष्यनिर्मित तलावांची खोली कमी असल्याने (अंग उघडं पडलं तरी) बिंग फुटत नाही कारण उभं राहता येतं!

आपल्याकडे पालक मुलांना ‘मला डॉक्टर व्हायचं होतं पण जमलं नाही,आता तू डॉक्टर हो’ म्हणत त्या मार्गाला वळवतात, तो प्रकार मी पोहण्याच्या बाबतीत केला. सक्तीने मुलांवर काही लादलं की जे होणार तेच आमच्याही बाबतीत घडलं. तिने काही महिन्यात पाण्याचा नाद सोडला. आम्ही अनेक प्रकार करून पाहिले, ती काही तिकडे वळेना. फक्त दोनच उपाय करायचे राहिले होते: पांढरे बुधवार हे उपास आणि आमच्या कुंडलीत जलयोग नाही म्हणून एक सत्यनारायण घालणं! अशातच ती शाळेत जाऊ लागली. वादाचे नवे विषय मिळाले आणि मग मैत्रिणींच्या नादाने आपोआपच पाण्यात पडून ती पोहायला लागली. हुश्श. आता मला नात किंवा नातू होईपर्यंत हा विषय खड्ड्यात - नव्हे पाण्यात जाऊ दे!!!

**- ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर**

---

GENISYS
CREDIT UNION
Where you come first.

# Bhushan Kulkarni and family

## wishes you all




# Happy Ganesh Chaturthi

HONEST®

SKIP THE LINE,
ORDER ONLINE

SCAN ME

TROY MI
248.315.0234

DETROIT MMD 2023

आपले मंडळ

# MAHARASHTRA MANDAL OF DETROIT

**Established in 1977**

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

MMD is a growing community in and around Detroit Metro area.

The main objective of the programs we organize is not just to entertain but also to preserve our cultural traditions, encourage the youth to get involved, welcome newcomers to the country and fill the void created by the distance from our motherland.

## MMD in Numbers

| 45+ | 450+ | ~1000 | 3000+ | 4000 |
|---|---|---|---|---|
| Years of Serving the Community | Member Families In 2023 | Average Event Attendees | Email Distribution Reach | Attendees Hosted at BMM 2017 |

## What we do

- Foster Indian traditions and promote arts and culture to build a strong community
- Organize cultural programs. (e.g., Gudi padwa, Diwali, Ganpati Festival, Etc.)
- Promote local artists, and theatrical performance
- Promote & encourage charitable & volunteering activities
- Provides leadership opportunities for all ages
- Operate & maintain Marathi Shala in two locations- Canton and Troy, MI.
- Supports MAI Services (NGO supporting Asian Indian families in need)
- Inhouse Dhol Tasha Percussion Band, #3 at US National level

## Upcoming Programs

**Oct**

**Kojagiri- Oct 22**
Hawk Auditorium, Farmington Hills
Musical Program &
Ank Ninad Mehfil

**Nov**

**Diwali- Nov 18**
Novi High School
AGM & Comedy Marathi
Natak (Local Michigan Professionals)

**Dec**

**Dec 09**
Volunteer
Appreciation Party

# Best Compliments

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

SKY GROUP GRAND, LLC
REAL ESTATE GROUP

LAKESHORE GLOBAL
INFRASTRUCTURE CONTRACTORS

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

**“आपले मंडळ ”**

*|| Maharashtra Mandal of Detroit ||*

# स्नेहबंध



## गणपती बाप्पा मोरया ...

## पुढच्या वर्षी लवकर या...

सप्टेंबर २०२३

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ